# प्रेमानंद 'बी' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२, सब प्लॉट नं. ३० भाग, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

दिनांक : २३/०९/२०२३

## विशेष सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

आपल्या सभेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि.१७/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० (अकरा) वाजता इंद्रधनुष्य सभागृह, राजेंद्रनगर, तेंडुलकर गार्डन समोर, पुणे – ४११०३० येथे आयोजित करण्यात आली होती. तथापि काही तांत्रिक कारणास्तव सभेचे स्थळ बदलून ''महाराष्ट्र साहित्य परिषद'', टिळक रोड, पुणे – ४११०३० येथे बोलाविण्यात आली. गणसंख्येअभावी सदरची सभा मा. अध्यक्ष यांनी अर्धातास तहकुब करून सदरची सभा त्याच ठिकाणी भरेल व त्यास गण संख्येची आवश्यकता नाही असे जाहिर केले. सदरची सभा अर्धातासानंतर मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सुरू करण्यात आली.

कार्यपत्रिकेवरील विषय घेण्याअगोदर आपल्या संस्थेच्या पुनर्विकास कामाचे विकसक मे. गंगोत्री होम्स् यांचे उपस्थित असलेले श्री. गणेश जाधव, श्री. मकरंद केळकर आणि श्री. राजेंद्र औटे, श्री. संजय औटे यांचा सत्कार संस्थेचे सभासद श्री. उदय सोनाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार यांचाही सत्कार श्री. वसंत देसाई यांच्या हस्ते करण्यात आला व इतर कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार श्री. गणेश द्रविड यांचे हस्ते करण्यात आला.

मा. अध्यक्ष श्री. दिपक ढेलवान यांनी सभेस सुरवात करणेबाबत मा. सचिव श्री. मिलींद कुकलर्णी यांना कार्यपत्रिकेवरिल विषय घेणेबाबत सूचना केली. त्यानुसार मा. सचिव यांनी विषय पत्रास सुरवात केली.

**विषय क्र. १ :** मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

**ठराव क्र. १ :** मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व त्यास मान्य करण्याचे ठरले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्री. किरण देशपांडे अनुमोदक : श्री. अजय गायकवाड

**विषय क्र. २ :** विकसक मे. गंगोत्री होम्स यांचेबरोबर संस्थेच्या पुनर्विकास कामाचे करावयाच्या ''विकसन करारनामा कुलमुखत्यार पत्र'' यांच्या मसुद्यास चर्चा करून त्यावर निर्णय घेणे.

**ठराव क्र. २ :** विकसक मे. गंगोत्री होम्स यांचेबरोबर संस्थेच्या पुनर्विकास कामाचे करावयाच्या ''विकसन करारनामा कुलमुखत्यार पत्र'' हे प्रोजेक्टरद्वारे विकसक मे. गंगोत्री होम्सचे मा. श्री. गणेश जाधव यांनी मुद्देसुद माहिती उपस्थित सभासदांना समोर सादर करण्यात आली.

या प्रसंगी श्री. महेश कोंडे यांनी (पार्किंग) वाहनस्थळ बाबत प्रश्न विचारले. याबाबत मा. श्री. गणेश जाधव यांनी वाहनस्थळाविषयी विचारलेल्या प्रश्नाचे निरसन केले. यावेळी सभासद श्रीमती सुषमा देसाई यांनी 'ग्रीन बिल्डींग' म्हणजे काय असा प्रश्न

विचारला त्यावेळी मा. श्री. गणेश जाधव यांनी 'ग्रीन बिल्डींग' बाबत विस्तृतपणे माहिती दिली. त्यानंतर श्रीमती सुषमा देसाई यांनी नॉमिनेशन, बक्षिसपत्र याबाबत प्रश्न विचारले. या प्रश्नाला विकसकांचे कायदेतज्ञ श्रीमती काबरा मॅडम यांनी सविस्तर माहिती समजून सांगितली. काही प्रश्न काही सभासदांनी उपस्थित केले त्यात प्रामुख्याने घरभाडे, सदनिकेचा ताबा विकसकाकडे देणेबाबत प्रश्न विचारले. याबाबत मा. श्री. गणेश जाधव यांनी सविस्तर सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांचे योग्य निरसन केले.

याबाबत सादब बाधक चर्चा होवून सादर केलेला विकसक करारनामा कुलमुखत्यारपत्र मान्य करून व त्यावर उपस्थित सभासदांनी स्वाक्षरी करण्याचे ठरले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्री. शशी पटवर्धन अनुमोदक : श्री. हेमंत चौधरी

**विषय क्र. ३ :** संस्थेच्या पुनर्विकास कामाचे विकसन करारनाम्यावर/ सदनिका धारकाने स्वाक्षरी केली नाही तर निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३ :** संस्थेच्या पुनर्विकास कामाचे विकसन करारनाम्यावर एखाद्या सभासदाने, सदनिकाधारकाने स्वाक्षरी केली नाही तर विकसन कामात अडथळा येवून उशीर होवू नये म्हणून विकसन करारनाम्यावर स्वाक्षरी न करणाऱ्या सभासदांची नावे विकसक करारनाम्यातून वगळण्यात यावी.

सदरची कार्यवाही करताना पूर्वी विशेष सर्वसाधारण सभेत ठरल्याप्रमाणे ज्या व्यक्तीकडून संस्थेच्या विकसन कामात अडथळा आणल्यामुळे व्यक्तीकडून संस्थेच्या झालेल्या/होणाऱ्या नुकसान भरपाईबाबत दावा करण्याचा अधिकार ''अबाधित'' राखून सदरची कार्यवाही करण्यात यावी.

विकसन कामात अडथळा आणणाऱ्या सभासद/सभासदांचे वारसदार इ. विरुद्ध सक्षम न्यायालयात संस्थेच्या वतीने दावा दाखल करण्यात यावा. अशा दाव्यावर संस्थेच्यावतीने स्वाक्षरी करण्याचे प्रतिज्ञापत्र, वकील पत्रावर सह्या करणे, सुनावणीस हजर राहणे व अन्य सर्व कामे करण्याचे अधिकार संस्थेच्या वतीने मा.अध्यक्ष व मा.सचिव यांना देण्यात येत आहेत. या विषयाबाबत सादक बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्री. संदिप इनामदार अनुमोदक : श्री. प्रविण फडणीस

**विषय क्र. ४ :** आयत्यावेळी कोणताही विषय न आल्याने मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्री. अजय गायकवाड अनुमोदक : श्रीमती अनघा मुळे

प्रेमानंद बी सहकारी गृहरचना संस्था मर्या.

***** अध्यक्ष सचिव खजिनदार